**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१**

मी शपथेवर सत्यकथन करतो की,

माझे नाव — शंकर रावसाहेब गायकवाड,

वय:– ७७ वर्षे, धंदा:– शेती,

राहणार:– जातेगाव, ता. जामखेड, जि. अहमदनगर.

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ (प्रतिवादी क्रमांक ०१) यांचा उलटतपास प्रतिवादीचे सुविद्य विधिज्ञ श्री. बी. व्ही. जायभाय यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

**०१.** हे म्हणणे खरे आहे की, मला लिहिता वाचता येते. दावा मिळकतीचा गट क्रमांक ६८३ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ६८३ ही मिळकत पूर्वी माझ्या वडीलांचे नावे होती. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ६८३ ही मिळकत आमची वडीलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांच्या मृत्युनंतर गट क्रमांक ६८३ मधील मिळकतीला माझ्या एकटयाचे वारस म्हणून नाव लागले. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मला गट क्रमांक ६८३ मधील मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची माहिती आहे.

**०२.** गट क्रमांक ६८३ मधील माझे वडीलोपार्जित क्षेत्र एकूण ४ एकर इतके होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ६८३ मधील पो ख. चे क्षेत्र २२ गुंठे असून व उर्वरित क्षेत्र हे वहिता खालील होते.

**०३.** आता मला निशाणी क्रमांक ४९ व ५० येथील सन १९८७ ते १९९८ पर्यंतच्या ७/१२ उताऱ्यांची प्रमाणित प्रती दाखविण्यात आल्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर ७/१२ उताऱ्यांवर माझे व वादी क्रमांक ०२ मधुकर यांची नावे भोगवटदार सदरी असून माझ्या नावासमोर १हे २६ आर इतके क्षेत्र असून वादी क्रमांक ०२ यांच्या नावासमोर ३५ आर इतके क्षेत्र नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर ७/१२ उताऱ्यावर माझ्या नावासमोर पोट खराबा क्षेत्र नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक ०२ मुधुकर यांच्याही नावासमोर पोट खराबा क्षेत्र नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जेव्हा गट क्रमांक ६८३ मधील क्षेत्र विक्री केले तेव्हा पोट खराबाचे क्षेत्र गोलक स्वरुपाचे होते. हे म्हणणे खरे नाही की, एखादया ७/१२ उताऱ्यावर वहितीचे क्षेत्र वगळता पोट खराबाचे क्षेत्र देखील दर्शविले जाते.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, मी जेव्हा गट क्रमांक ६८३ मधील क्षेत्र विक्री केले त्यावेळी भूविकास बँकेचा बोजा गट क्रमांक ६८३ वरील ७/१२ उताऱ्यावर दर्शविलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २०११ मध्ये मी तहसिलदार यांचे समक्ष प्रकरण दाखल करुन माझ्या नातवाच्या नावे गट क्रमांक ६८३ मधील मिळकत केली. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी देखील भूविकास बँक व महाराष्ट्र बँकेचा यांचा बोजा गट क्रमांक ६८३ वरील मिळकतींवर होता.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, अशा परिस्थितीत मी वादी क्रमांक ०२ मधुकर यांना २८/०४/१९९४ रोजी गट क्रमांक ६८३ मिळकतीचे खरेदीखत करुन दिले. आता मला निशाणी क्रमांक २९ येथील खरेदीखत दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर खरेदीखतावर लिहून देणार म्हणून माझी सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतावर साक्षीदार म्हणून भिकाजी रघुनाथ पाटील, त्रिंबक माधवराव गायकवाड, अर्जून रावसाहेब गायकवाड व आणखी एका व्यक्तीने अशा एकूण ०४ लोकांनी सहया केलेल्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर निशाणी क्रमांक २९ येथील खरेदीखतातील मजकूर हा माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला असल्याने मी त्यावर सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतातील संपूर्ण मजकूर हा खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतामध्ये गट क्रमांक ६८३ चे क्षेत्र १हे ८७ आर इतके दर्शविलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे १ हे ८७ आर हे क्षेत्र वहिवाटीचे व पोट खराबाचे असे मिळून आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतान्वये मी वादी क्रमांक ०२ मधुकर यांना ३५ आर जमीन विक्री केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतामध्ये ''येणेप्रमाणे वरील जमीन मी तुम्हास वरील रुपयांस आज रोजी कायम खरेदी देवून तुमची कब्ज्यात दिली आहे. तिची वहिवाट यापुढे तुम्ही मालकी हक्काने करावी वंशपरंपरेने निरंतर सुखे उपभोग घ्यावा. मी अगर माझे वाली वारस भाऊबंद वगैरे कोणी हरकत करणार नाही. अगर कोणी तुमचे उपभोगास हरकत केल्यास त्याचे निवारण मी माझे पदर खर्चाने करीन '' असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतामध्ये वादी क्रमांक ०२ यांना दिलेले खरेदीखत हे परत सोडवून करण्याच्या बोलीवर झाले असलेबाबत नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदचे खरेदीखत किती वर्षांनी, किती रक्कम व कोणत्या व्याजदाराने परत देण्याच्या बोलीवर ठरले असलेबाबत नमुद केलेले नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदरचा व्यवहार हा तोंडी

ठरलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर तोंडी व्यवहाराबाबत माझ्या तोंडी व्यक्तीरीक्त इतर कागदोपत्री पुरावा नाही.

**०६.** दिनांक २४/०६/२०१६ रोजी वादी क्रमांक ०२ ने प्रतिवादी क्रमांक ०१ ला गट क्रमांक ६८३ मधील त्याच्या नावावरील मिळकत विक्री केले. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा व्यवहार हा खरेदीखत दस्त क्रमांक ११४१/१६ आन्वये झाला. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या व्यवहाराबाबत मी हरकत दर्शविली. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजीपर्यंत वादी क्रमांक ०२ यांचे नाव गट क्रमांक ६८३ मधील ७/१२ उताऱ्यावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २८/०४/१९९४ रोजी मी वादी क्रमांक ०२ यांस गट क्रमांक ६८३ मधील मिळकत विक्री केली व त्यानंतर दिनांक २४/०६/२०१६ वादी क्रमांक ०२ याने सदर मिळकत वादी क्रमांक ०१ यांस साधारणत: २२ वर्षांनी विक्री केली.

**०७.** सन १९९४ ते २०१६ पर्यंत मी वादी क्रमांक ०२ यांस विक्री केलेले क्षेत्र परत सोडवून मिळणे बाबत काय प्रयत्न केले त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत मी माझ्या विधिज्ञांमार्फत वादी क्रमांक ०२ यांस नोटीस पाठविलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१० सालापासून ७/१२ उतारे हे ऑनलाईन झाले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे गटांमधील पोट खराबांचे क्षेत्र हे ७/१२ उताऱ्यावर प्रत्येकाच्या नावासमोर दिसु लागले. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक ०२ यांच्या नावाची नोंद गट क्रमांक ६८३ मधील मिळकतीवर खरेदीखतांन्वये लागल्यानंतर त्याच्या नावासमोर पोट खराबाचे क्षेत्र दर्शविलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ६८३ मध्ये गोलक असलेला पोट खराबा हा प्रत्येक भोगवटदाराच्या नावासमोर दर्शविल्यामुळे वादी क्रमांक ०२ यांच्या नावासमोर ०.०६ आर इतके क्षेत्र पोट खराबा अंतर्गत दर्शविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे ७/१२ उताऱ्यावरील पोट खराबाचे क्षेत्र वादी क्रमांक ०२ यांच्या नावासमोर लावण्याकरीता मी कोणताही प्रयत्न केला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदरचे क्षेत्र वादी क्रमांक ०२ यांनी त्यांच्या नावासमोर लावून घेतले आहे.

**०८.** हे म्हणणे खरे आहे की, एखादे खरेदीखत झाल्यानंतर खरेदीखतामधील क्षेत्र महसूल

दप्तरी नावावर लावून घेण्याकरीता खरेदीखताची प्रत दयावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, एखादी विहिर ७/१२ उताऱ्यावर नावासमोर दाखवायची असेल तर त्याकरीता महसूल दप्तरी अर्ज दयावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ६८३ मधील ७/१२ उताऱ्यावरील पोट खराबाचे क्षेत्र वादी क्रमांक ०२ यांनी त्यांच्या नावासमोर कशा पध्दतीने लावले हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही.

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, मी वादी क्रमांक ०२ यासोबत केलेला व्यवहार हा तोंडी सोडविण्याच्या बोलीवर साक्षीदारांसमक्ष केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर साक्षीदारांची नावे माझ्या कैफियतीमध्ये तसेच पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केलेले नाहीत.

**१०.** सन २०१६ चे चैत्र शुध्द पाडव्याच्या दिवशी कोणती तारीख व कोणता वार होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दिवशी मी वादी क्रमांक ०२ यांस रक्कम रुपये १० हजार दिल्याबाबतचा माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वादी क्रमांक ०२ यांस दिलेले रक्कम रुपये १० हजार परत मिळणेबाबत त्यांना विधिज्ञांमार्फत नोटीस दिली नव्हती तसेच मी इतर कोणतीही दाद मा. न्यायालयाचे समक्ष त्यावेळी मागितली नव्हती.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, सन २०१० पासून ते २०१६ पर्यंत मी गट क्रमांक ६८३ चा ७/१२ उताऱ्याची प्रत पाहिलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी क्रमांक ०२ चे वहिवाटीला हरकत अडथडा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्रमांक ०२ याने त्याच्या नावावरील मिळकत वादी क्रमांक ०१ याच्या नावावर केल्याने मला मला त्यांच्याप्रती राग आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक ०२ याच्या नावासमक्ष लागलेल्या पोट खराबाच्या क्षेत्रामुळे माझ्या मनामध्ये त्याच्या प्रती राग होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी वादी क्रमांक ०१ व ०२ यांना हरकत अडथळा करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४/०६/२०१६ रोजी मी वादींना हरकत अडथळा केला. हे म्हणणे खरे आहे की, २६/११/२०१६ रोजी वादी यांनी जामखेड पोलीस ठाणे येथे माझ्याविरुध्द व इतर व्यक्तींचेविरुध्द तक्रार दिली. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदरची तक्रार खोटी आहे.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, वादी क्रमांक ०१ व ०२ यांचे क्षेत्र बागायती असून त्यांनी ते क्षेत्र सुधारलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीची किंमत वाढलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला वादीचे उत्पन्न व उत्कर्ष देखावला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दादागीरी व दहशतीच्या जिवावर मला दावा मिळकत परत मिळवायची आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत दाव्यात दिलेली कैफियतेतील व पुराव्याच्या शपथपत्रातील मजकूर हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी मा. न्यायालयाचे समक्ष खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण,**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/-

दिनांक:- १६/०३/२०२५
ठिकाण:- जामखेड

**(अनुश्री ब. फंड)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**जामखेड**.

**(साक्षीदाराचा जबाब त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदविला)**